1 7 NOV 202

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सेवा देण्यात विद्यापीठ राज्यात दुसरे

## उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून प्रशासकीय मूल्यांकन

■ सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. १६ : उच्च व तंत्रशिक्षण विभागाने राज्यातील तेरा अकृषी विद्यापीठांचे प्रशासकीय मूल्यांकन केले. त्यात शिवाजी विद्यापीठाने शंभर पैकी ६६ गुणांसह दुसरा क्रमांक मिळविला आहे. सर्व कर्मचाऱ्यांचे सेवापुस्तक अद्ययावत आणि डिजिटल करण्यात विद्यापीठाला सर्वाधिक गुण मिळाले आहेत.**



सेवाकर्मी कार्यक्रमांतर्गत उच्च शिक्षण विभागाने विविध नऊ निकषांवर राज्यातील विद्यापीठांचे प्रशासकीय मूल्यांकन केले. त्यामध्ये शिवाजी विद्यापीठाने सेवापुस्तक अद्ययावतीकरणामध्ये वीसपैकी वीस, तर सर्व संवर्गाची अद्ययावत ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करणे, पदोन्नतीने नियुक्तीची स्थिती आणि अनुकंपा नियुक्तीची दहापैकी दहा गुणांची कमाई केली आहे. बिंदूनामावली प्रमाणीकरणामध्ये दहापैकी आठ गुण मिळाले आहेत. मात्र, सेवा प्रवेश नियम, सरळसेवा नियुक्ती रिक्त परिस्थिती या निकषामध्ये अवघे चार गुण मिळाले आहेत. आकृतीबंध आणि आयजीटीओ पोर्टलवर नोंदणीमध्ये विद्यापीठाला गुणांचे खाते उघडता आले नाही. प्रशासकीय आकृतीबंध निश्चित नसल्याचा विद्यापीठाला फटका बसला आहे. आयजीटीओ पोर्टलमध्ये चांगली कामगिरी असूनदेखील काय कमी पडले, याचे विश्लेषण विद्यापीठाकडून केले जाणार आहे. दरम्यान, या मूल्यांकनात ६८ गुणांसह गोंडवाना विद्यापीठाने पहिला आणि मुंबई विद्यापीठाने ६६ गुणांसह दुसरा क्रमांक मिळविला आहे.

### विद्यापीठाला मिळालेले निकषनिहाय गुण

| | |
|---|---|
| ■ सेवापुस्तक अद्ययावत करणे | २० |
| ■ सर्व संवर्गाची अद्ययावत ज्येष्ठता सूची प्रसिद्ध करणे | १० |
| ■ पदोन्नतीने नियुक्तीची स्थिती | १० |
| ■ अनुकंपा नियुक्ती | १० |
| ■ बिंदूनामावली प्रमाणीकरण | ८ |
| ■ सेवाप्रवेश नियम | ४ |
| ■ सरळसेवा नियुक्ती रिक्त पद स्थिती | ४ |
| ■ आकृतीबंध आणि आयजीओटी पोर्टलवर नोंदणी | ० |

**सादर केलेल्या माहितीवर मूल्यांकन**

या सर्व विद्यापीठांनी शासनाला यापूर्वी सादर केलेल्या माहितीच्या आधारे उच्च व तंत्रशिक्षण विभागाने २०२४-२५ या शैक्षणिक वर्षामधील कामगिरीचे मूल्यमापन करून राज्यस्तरीय प्रशासकीय मूल्यांकन जाहीर केले आहे. शासनाकडून पहिल्यांदाच अशा पद्धतीने मूल्यांकन करण्यात आले आहे.

> “ ‘विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांनी लावलेली प्रशासकीय शिस्त, परंपरा विद्यापीठाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी अबाधित ठेवली आहे. त्याचे फलित या मूल्यांकनाच्या माध्यमातून मिळाले आहे. या यशाचे सर्व श्रेय विद्यापीठाच्या कर्मचाऱ्यांचे आहे.
>
> **- डॉ. व्ही. एन. शिंदे, कुलसचिव**

Scanned with OKEN Scanner

17 NOV 2025 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रशासकीय मूल्यांकनात शिवाजी विद्यापीठ राज्यात तिसरे

## सेवा पुस्तक अद्ययावत, डिजिटल करण्यात पैकीच्या पैकी गुण

## उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून अहवाल जाहीर; १०० पैकी ६६ गुण

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

उच्च व तंत्रशिक्षण विभागाने सेवाकर्मी कार्यक्रमांतर्गत केलेल्या प्रशासकीय मूल्यांकनात शिवाजी विद्यापीठाने राज्यात तिसरा क्रमांक पटकाविला. त्यामुळे शिवाजी विद्यापीठाने पुन्हा एकदा शैक्षणिक गुणवत्तेबरोबर प्रशाकीय गुणवत्ता सिद्ध करीत शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. मूल्यांकनात गोंडवाना विद्यापीठ पहिला, मुंबई विद्यापीठाने दुसरा क्रमांक मिळवला. सावित्राबई फुले पुणे विद्यापीठ सर्वात कमी गुण मिळवून पिछाडीवर राहिले आहे.

राज्याच्या उच्च आणि तंत्रशिक्षण विभागाने नुकताच प्रशासकीय मूल्यांकन अहवाल जाहीर केला आहे. सेवाकर्मी कार्यक्रमांतर्गत राज्यातील १३ अकृषी विद्यापीठांचे मूल्यांकन करण्यात आले. या मूल्यांकनात आकृतिबंध, सेवा प्रवेश नियम, कर्मचाऱ्यांची अद्ययावत ज्येष्ठता सूची, सेवा पुस्तके अद्ययावत ठेवणे आणि ती डिजिटल करणे, सरळ सेवा नियुक्ती रिक्त स्थिती, बिंदूनामावली प्रमाणीकरण, अनुकंपा नियुक्ती, 'आयजीओटी' पोर्टलवर रजिस्ट्रेशन आदी महत्त्वाच्या निकषासाठी १०० गुण देण्यात आले. क्रमवारीत गोंडवाना विद्यापीठ पहिला क्रमांक (६८ गुण); मुंबई आणि शिवाजी विद्यापीठ (६६ गुण) अनुक्रमे दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकावर आहे.


सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठास सर्व कर्मचाऱ्यांचे सेवा पुस्तक अद्ययावत करणे व डिजिटल करणे या घटकासाठी शून्य गुण मिळाले, तर याच विभागात मुंबई, कोल्हापूर, गोंडवाना व अमरावती विद्यापीठांनी २० पैकी २० गुण मिळवत उत्कृष्ट कामगिरी केली. उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या मूल्यांकनाबाबत विद्यापीठ वर्तुळात उलटसुलट चर्चा सुरू झाली आहे. मूल्यांकनावर काही कर्मचारी, माजी पदाधिकाऱ्यांनी सवाल उपस्थित केला आहे.

### कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह

पुणे शहराची ओळख विद्येचे माहेरघर म्हणून आहे; परंतु उच्चशिक्षण विभागाच्या प्रशासकीय मूल्यांकनात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठास १०० पैकी केवळ ४२ गुण मिळाले आहेत. ही चिंतेची बाब असून यामुळे विद्यापीठ प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

### टॉप फाईव्ह विद्यापीठे

- गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली - ६८ गुण
- मुंबई विद्यापीठ - ६६ गुण
- शिवाजी विद्यापीठ - ६६ गुण
- संत गाडगेबाबा विद्यापीठ, अमरावती - ६२ गुण
- एसएनडीटी महिला विद्यापीठ - ७ गुण



जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 NOV 2025
लोकमत

# प्रशासकीय मूल्यांकन क्रमवारीत शिवाजी विद्यापीठ राज्यात तिसरे

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला मागे टाकून सिध्द केली गुणवत्ता

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला मागे टाकून शिवाजी विद्यापीठाने प्रशासकीय मूल्यांकनात राज्यात तिसऱ्या क्रमांक पटकाविला आहे. उच्च आणि तंत्रशिक्षण विभागाने सेवाकर्मी कार्यक्रमांतर्गत हा प्रशासकीय मूल्यांकन अहवाल जाहीर केला. यात शिवाजी विद्यापीठाने पुन्हा एकदा शैक्षणिक गुणवत्तेबरोबर प्रशासकीय गुणवत्ता सिध्द केली आहे.

सेवाकर्मी कार्यक्रमांतर्गत राज्यातील १३ अकृषी विद्यापीठांचे मूल्यांकम केले. या मूल्यांकनात आकृतीबंध, सेवा प्रवेश नियम, कर्मचाऱ्यांची अद्ययावत ज्येष्ठता सूची, सेवा पुस्तके अद्ययावत ठेवणे आणि ती डिजिटल करणे, सरळ सेवा नियुक्ती रिक्त स्थिती, बिंदूनामावली प्रमाणीकरण, अनुकंपा नियुक्ती, 'आयजीओटी' पोर्टलवर रजिस्ट्रेशन आदी महत्त्वाच्या निकषासाठी १०० गुण देण्यात आले. या मूल्यांकन क्रमवारीत गोंडवाना विद्यापीठाने पहिला (६८ गुण) आणि मुंबई तसेच शिवाजी विद्यापीठाने दुसरा आणि तिसरा क्रमांक (६६ गुण) मिळवला आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ सर्वात कमी गुण मिळवून मागे राहिले आहे.



### २० पैकी २० गुण

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठास सर्व कर्मचाऱ्यांचे सेवा पुस्तक अद्ययावत करणे व डिजिटल करणे या घटकासाठी शून्य गुण मिळाले आहेत. याच विभागात मुंबई, कोल्हापूर, गोंडवाना व अमरावती विद्यापीठांनी २० पैकी २० गुण मिळवत उत्कृष्ट कामगिरी केली आहे. पुणे शहराची ओळख विद्येचे माहेरघर म्हणून आहे, परंतु उच्च शिक्षण विभागाच्या प्रशासकीय मूल्यांकनात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठास १०० पैकी केवळ ४२ गुण मिळाले आहेत. ही चिंतेची बाब असून यामुळे विद्यापीठ प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

### पहिली पाच विद्यापीठे

गोंडवना विद्यापीठ, गडचिरोली-६८ गुण
**मुंबई विद्यापीठ- ६६ गुण**
शिवाजी विद्यापीठ- ६६ गुण
**संत गाडगेबाबा विद्यापीठ, अमरावती- ६२ गुण**
एसएनडीटी महिला विद्यापीठ-५७ गुण

Scanned with OKEN Scanner

17 NOV 2025 पुढारी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'एआय'चा वापर केल्यास उत्तम छायाचित्रण शक्य

## प्रशांत नाकवे; मास कम्युनिकेशन विभागातर्फे व्याख्यान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

छायाचित्रणात कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वापर कौशल्यपूर्ण पद्धतीने केल्यास चांगले परिणाम मिळू शकतात. मात्र, तो करताना छायाचित्रणातील तज्ज्ञांची मदत घेऊन वापर करावे. 'एआय'कडून काम करून घेण्यासाठी मानवाचीच गरज आहे, असे प्रतिपादन फोटो जर्नालिस्ट प्रशांत नाकवे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ मास कम्युनिकेशन व युनाते क्रिएशन आयोजित 'फोटो जर्नालिझम आणि एआय'चे आव्हान या विषयावर आयोजित विशेष व्याख्यानप्रसंगी ते बोलत होते. ज्येष्ठ छायाचित्रकार रघू जाधव यांनी ट्रिक फोटोग्राफीबद्दल माहिती दिली. छायाचित्रकारांनी छायाचित्रांचे डॉक्युमेंटेशन करणे महत्त्वाचे असल्याचे ते म्हणाले.

रा. शि. गोसावी कलानिकेतन महाविद्यालयाचे प्राचार्य मनोज दरेकर यांनी छायाचित्रणाची कला शिकताना त्याची तत्त्वे समजून घेण्याची सूचना केली. छायाचित्रकार अस्मिता जाधव यांनी छायाचित्रणामध्ये मानसिकतेचा कसा वापर होतो, हे सांगितले. यावेळी शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागाचे डॉ. शिवाजी जाधव, प्राचार्य अजेय दळवी, विजय टिपुगडे, व्हाईट आर्मीचे अशोक रोकडे, शुभम चेचर, क्युरेटर व संशोधक दुर्गा आजगावकर, संगाप्पा शिवपुजे आदी उपस्थित होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ मास कम्युनिकेशन विभागातर्फे आयोजित विशेष व्याख्यानप्रसंगी बोलताना फोटो जर्नालिस्ट प्रशांत नाकवे. समवेत डॉ. शिवाजी जाधव. (छाया : नाज ट्रेनर)

Scanned with OKEN Scanner

# 'ए. आय.'चा वापर कौशल्यपूर्ण केल्यास उत्तम परिणाम

## प्रशांत नाकवे : शाहू स्मारक भवनात 'डायफ्राम' प्रदर्शनात व्याख्यान

*कोल्हापूर, ता. १६ :* छायाचित्रणात ए. आय.चा वापर कौशल्यपूर्ण पद्धतीने केल्यास उत्तम परिणाम मिळू शकतात. मात्र तो करताना सामुदायिकरीत्या करा. छायाचित्रणातील तज्ज्ञांची मदत घेऊन एआयचा वापर करा. ए.आय.कडून काम करून घेण्यासाठी मानवाचीच गरज आहे, असे प्रतिपादन फोटो जर्नालिस्ट प्रशांत नाकवे यांनी केले.

ते शिवाजी विद्यापीठाचे मास कम्युनिकेशन आणि युनाते क्रिएशन आयोजित 'फोटो जर्नालिझम आणि ए. आय.चे आव्हान' या विषयावर ते बोलत होते. येथील राजर्षी शाहू स्मारक भवनात 'डायफ्राम' या प्रदर्शनात या



कोल्हापूर : येथे 'फोटो जर्नालिझम आणि ए. आय.चे आव्हान' या विषयावरील व्याख्यानात प्रशांत नाकवे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी अस्मिता जाधव, मनोज दरेकर, रघू जाधव, डॉ. शिवाजी जाधव.

व्याख्यानाचे आयोजन केले होते. ज्येष्ठ छायाचित्रकार रघु जाधव यांनी ट्रिक फोटोग्राफी कशी फायद्याची आहे हे सांगितले. छायाचित्रकारांनी आपल्या छायाचित्रांचे डॉक्युमेंटेशन करणे महत्त्वाचे असल्याचेही त्यांनी नमूद केले. रा. शि. गोसावी कलानिकेतन महाविद्यालयाचे प्राचार्य मनोज दरेकर यांनी छायाचित्रणाची कला शिकताना त्याची तत्त्वे समजून घेण्याचा सल्ला दिला. छायाचित्रकार अस्मिता जाधव यांनी छायाचित्रणामध्ये मानसिकतेचा कसा वापर होतो, हे स्पष्ट केले.

शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागाचे डॉ. शिवाजी जाधव, प्राचार्य अजेय दळवी, विजय टिपुगडे, बी. डी. चेचर, व्हाईट आर्मीचे अशोक रोकडे, शुभम चेचर, क्युरेटर व संशोधक दुर्गा आजगावकर, संगाप्पा शिवपुजे उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner

17 NOV 2025 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाकडून नवमूल्य संवर्धित कवितेचा गौरव

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कवितेतून मानवी मूल्यांची जपणूक करणाऱ्या कवींचा सन्मान करण्याचा उपक्रम शिवाजी विद्यापीठाने सुरू ठेवला असून, यंदाच्या काव्य पुरस्कार सोहळ्यात ज्येष्ठ कवी अरुणचंद्र गवळी (पुणे) यांना सतीश काळसेकर काव्य पुरस्कार आणि युवा कवी फेलिक्स डिसोजा (वसई) यांना ऋत्विज फाळसेकर काव्य पुरस्कार प्रदान करण्यात आला.

विद्यापीठाच्या गणित अधिविभाग सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात साहित्यिक डॉ. माया पंडित यांनी प्रमुख पाहुण्या म्हणून मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे होते. पुरस्कार स्वीकृत करताना अरुणचंद्र गवळी भावुक झाले. माझा पहिला कवितासंग्रह प्रकाशित होण्यासाठी सतीश काळसेकरांचे मोठे पाठबळ मिळाले. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ मिळणारा हा पुरस्कार माझ्यासाठी अत्यंत भावनिक क्षण आहे, असे ते म्हणाले.

युवा कवी फेलिक्स डिसोजा यांनीही मनोगत व्यक्त करताना सांगितले की, या पुरस्कारामुळे काळसेकरांचा आशीर्वाद लाभल्यासारखे वाटते. अध्यक्षस्थानावरून बोलताना कुलसचिव डॉ. शिंदे म्हणाले, दोन्ही कवींच्या कवितेत सामाजिक विषमतेवर नेमकेपणाने बोट ठेवले जाते. त्यांची कविता ही गाणे वाटत नाही; ती सर्वसामान्यांचे जीवन वाटते, हे तिचे वैशिष्ट्य आहे.

परीक्षक अजय कांडर यांनी गवळी व डिसोजा यांच्या निवडीमागील भूमिका स्पष्ट केली. कार्यक्रमात गणेश विसपुते यांनी नीलकंठ कदम यांची सतीश काळसेकरांना अर्पण केलेली कविता सादर केली. आदित्य काळसेकर यांनी काळसेकर कुटुंबाचा विद्यापीठाशी असलेला बांधिलकीचा वारसा पुढे नेण्याचे आश्वासन दिले. प्रास्ताविक व स्वागत डॉ. रणधीर शिंदे, सूत्रसंचालन प्रांजली क्षीरसागर यांनी केले. आभार सुखदेव एकल यांनी मानले. यावेळी डॉ. उदय नारकर, सायमन मार्टिन, प्राचार्य डॉ. अनिल गवळी, चंद्रकांत बाबर, जयसिंग पाटील, काळसेकर कुटुंबीय, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner

17 NOV 2025 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# व्हॉलीबॉल स्पर्धेत मंडलिक महाविद्यालय उपविजेता

## शिवाजी विद्यापीठांतर्गत विभागीय व्हॉलीबॉल स्पर्धा : १८ महाविद्यालयांचा समावेश

वार्ताहर
मुरगूड

विवेकानंद कॉलेज कोल्हापूर येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठांतर्गत विभागीय व्हॉलीबॉल स्पर्धेत येथील सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयाने उपविजेतेपद पटकावले. या संघाची कर्मवीर हिरे कॉलेज गारगोटी येथे होणाऱ्या आंतरविभागीय व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

विवेकानंद कॉलेज येथे झालेल्या या स्पर्धेत १८ महाविद्यालयांच्या संघांनी सहभाग घेतला होता. मुरगूडच्या मंडलिक महाविद्यालयाच्या संघाने स्पर्धेत भारती विद्यापीठ संघाला २५-४, २५-१२, डी. वाय. पाटील इंजिनिअरिंग कॉलेज, कोल्हापूरला २५-१८, २५-१३ तर उपांत्य फेरीत विवेकानंद कॉलेजचा २५-१८, २५-२३ या गुण फरकाने पराभव करीत अंतिम फेरीत प्रवेश केला. अंतिम फेरीत आण्णासाहेब डांगे महाविद्यालय, हातकणंगले यांच्या बरोबर झालेल्या अटीतटीच्या लढतीत मंडलिक महाविद्यालयाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.



मुरगूड : स्पर्धेतील उपविजेत्या संघासमवेत प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे, डॉ. शिवाजी पोवार, मार्गदर्शक महादेव कानकेकर.

या खेळाडूंचा सत्कार प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे यांच्या हस्ते करण्यात आला. प्रा. सरदेसाई यांनी आभार मानले.

या संघाला मार्गदर्शक महादेव कानकेकर, संघ व्यवस्थापक डॉ. शिवाजी पोवार, संभाजी मांगले, श्रावण कळांद्रे यांचे मार्गदर्शन लाभले. तर प्रा. संजय मंडलिक, ॲड. वीरेंद्र मंडलिक, संस्था अध्यक्ष गजानन गंगापुरे, अण्णासो थोरवत, प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे यांचे प्रोत्साहन लाभले.

**व्हॉलीबॉल संघातील खेळाडू**

गजानन गोधडे (कर्णधार), ओंकार लोकरे, सागर संकपाळ, करण मांगले, विवेक चौगले, नंदकिशोर चौगले, रवींद्र हळदकर, सत्यजित शिंदे, अभिजीत रामाने, बुद्धीराज माने, विश्वजीत रामाने, निखिल सावंत.

Scanned with OKEN Scanner

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 NOV 2025
सकाळ

# शिवाजी विद्यापीठांतर्गत आंतर विभागीय व्हॉलीबॉल स्पर्धा उद्यापासून गारगोटीत

**गारगोटी :** येथील मौनी विद्यापीठाच्या कर्मवीर हिरे महाविद्यालयाच्या वतीने आयोजित केली जाणारी शिवाजी विद्यापीठांतर्गत आंतर विभागीय व्हॉलीबॉल स्पर्धा १८ व १९ नोव्हेंबरला होणार आहे. स्पर्धेत सातारा, कोल्हापूर आणि सांगली या तीन जिल्ह्यांतील नामांकित महाविद्यालयांचे संघ सहभागी होणार आहेत. त्यामध्ये सातारा जिल्ह्यातून सहभागी होणारे संघ दहिवडी कॉलेज, दहिवडी, मुधोजी कॉलेज, फलटण, आर्टस्, सायन्स आणि कॉमर्स कॉलेज, नागठाणे, दौलतराव आहेर कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कऱ्हाड. कोल्हापूर जिल्ह्यातून सहभागी होणारे संघ अण्णासाहेब डांगे कॉलेज, हातकणंगले. सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगूड. विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर, देवचंद कॉलेज, अर्जुननगर. सांगली जिल्ह्यातून सहभागी होणारे संघ विलिंग्डन महाविद्यालय, सांगली, के. बी. पी. कॉलेज, इस्लामपूर, अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, आष्टा, सी. आय. एम. डी. आर. कॉलेज, सांगली. विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धेबद्दल उत्सुकता निर्माण झाली असून, दोन्ही दिवसांच्या सामन्यांना मोठी उपस्थिती लाभेल अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. ही स्पर्धा विद्यार्थ्यांमध्ये क्रीडा संस्कार, संघ भावना आणि आरोग्यदायी स्पर्धात्मकता वाढविण्यास निश्चितच मदत करेल, असा विश्वास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उदयकुमार शिंदे व शारीरिक शिक्षण संचालक प्रा. सचिन चौगले यांनी व्यक्त केला.

Scanned with OKEN Scanner

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 NOV 2025

तरुण भारत

# विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील परीक्षा उत्साहात

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर, नोव्हेंबर – २०२५ हिवाळी सत्रातील विविध ४७ पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा शनिवारी पार पडल्या. परीक्षेत एकूण १७ गैरप्रकाराची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत करण्यात आली आहे. यामध्ये कोल्हापूर १२, सांगली ४ व सातारा १ अशा गैरप्रकाराचा समावेश आहे. या परीक्षा ०३ नोव्हेंबर पासून सुरु झाल्या आहेत. विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने १८७ परीक्षा केंद्रावर सुरू असून सदर परीक्षांसाठी ३९ हजार ९३४ विद्यार्थी उपस्थित होते. परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रणासाठी भरारी पथकांची स्थापन केली आहे. परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनाप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी केले

Scanned with OKEN Scanner